महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.
Web : www.dhepune.org.in E-mail : budget.dhepune@nie.in
फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११५३

क्र.अर्थसं - २०१७/(०९९/१७)/लेखा २ / ८७२० दि. २१ जुलै २०१७

प्रति,

शिक्षण संचालनालय,(उच्च शिक्षण ) यांच्या
अधिनस्त असलेली, शासकीय महाविद्यालये /
संस्था / विभागीय सहसंचालक कार्यालये / वसतिगृहे

विषय - सन २०१७-१८ मधील निधी वितरण - खर्चाची मर्यादेत कपात करणेबाबत

संदर्भ - १. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र अर्थसं -२०१७ / प्र.क्र. ७५ अर्थ -३ दि.१८/४/२०१७
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र अर्थसं -२०१७ / प्र. क्र. ९४ अर्थ -३ दि.३०/६/२०१७
३.शासन पत्र क्र. संकीर्ण २०१७/ प्र.क्र. ५४/ साशि -१ दि. ६/७/२०१७
४.शासन पत्र क्र. संकीर्ण २०१७ / प्र.क्र. ०८/ विशि -२ दि १७/७/२०१७
५. शासन पत्र क्र. संकीर्ण २०१७/ प्र.क्र. ५४/ साशि -१ दि. १७/७/२०१७

उपरोक्त विषयाबाबत वित्त विभागाचे संदर्भांकित परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. याबाबत सादर करण्यात येते की, वित्त विभाग परिपत्रक दि. १८/४/२०१७ अन्वये महसुली लेख्यातील निधी एकूण अर्थसंकल्पित तरतुदीच्या ८० टकके मर्यादेत खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे. सदरहू निधी नऊ महिन्यासाठी (माहे डिसेबर २०१७ पर्यत ) बीम्स प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेला आहे.

शासन निर्णय दि.२८/६/२०१७ अन्वये शेतक-यासाठी विविध प्रकारची कर्जमाफी व प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना शासनाने जाहीर केलेली आहे. महापालिकांना वस्तु व सेवा कर संदर्भात भरपाई राज्य शासनास दयावी लागणार आहे. हा खर्च प्राधान्यक्रमाने करावयाचा असल्याने अर्थसंकल्पित केलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवणे क्रमप्राप्त झालेले आहे.

या अनुषंगाने दि.३०/६/२०१७ च्या परिपत्रकान्वये चालु वित्तीय वर्षाच्या कालावधीसाठी महसुली लेख्यातील निधी, खर्चाची मर्यादा ८० वरुन ७० टक्के केलेली आहे. या अनुषंगाने शासनाने संदर्भ पत्र क्र. ३ ते ५ अन्वये खर्चात कपात करण्याबाबतच्या सूचना संचालनालयाच्या अधिनस्त कार्यालयाना देण्याबाबत सुचीत केलेले आहे.

तरी वित्त विभाग शासन परिपत्रक दि.३०/६/२०१७ मध्ये नमुद करण्यात आलेल्या सूचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच आपणास मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीच्या ७० टक्के खर्च करण्यात यावा. यापेक्षा अधिकचा जास्तीचा खर्च करण्यात येवू नये.

(डॉ. धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,

मा. अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर